# महाराष्ट्र शासन

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्र.इडीडी-१०८८/१२१८५/के.नं.८२/सुधार-२.
**दिनांक १० ऑगस्ट १९८९.**

वाचाः
(१) शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्र.इडीडी-१०६३/न, दिनांक २५ जुलै,१९६२.
(२) शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्र.इडीडी-१०६२/५९५१३/न, दिनांक ११ जुलै,१९६३.
(३) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.इडीडी-१०७९/१२३६०/का-१०, दिनांक ७ मे १९८१.
(४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.इडीडी-१०८६/३५५/सीए-२, दिनांक १५ जानेवारी १९८७.
(५) संचालकःसमाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे पत्र क्रमांक डीएसडब्ल्यू-आरएमओडी-एफएच-रल्स/एसएसडब्ल्यू/जी-७/३४१२, दिनांक ७ मार्च १९८८ व क्रमांक इआरएच/डीडी/एमओडीएफ-रुल्स/एडरा-एपीपी-का-७ दिनांक १२ जुलै १९८८.

शासन निर्णयः-अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व उपकरणे जसे वैयक्तिक श्रवण यंत्रे, चष्मे, तीन चाकी सायकली, दुचाकी खुर्च्या, कॅलिपर्स, अपंगाचे बूट, मानेचे पटटे, स्पिनल ब्रेसेस, जॅकेट, इत्यादी साधने, शासनाकडून पुरविण्याची किंवा त्यांकरिता सहाय्य देण्याची योजना दिनांक २५ जुलै १९६२ व दिनांक १९६३ च्या शासन निर्णयाअन्वये मंजुर करण्यात आली असून त्यामध्ये दिनांक ७ मे १९८१ च्या शासन निर्णयान्वये अंशतः सुधारणा करण्यात आली होती आणि दिनांक १५ जानेवारी १९८७ च्या शासन निर्णयाद्वारे एका अपंग व्यक्तीसाठी रुपये १,००० ऐवजी रुपये १,३५० इतक्या किंमतीचे कृत्रिम अवयव व उपकरणे खरेदी करण्याचे अधिकार संचालक, समाज कल्याण, पुणे, यांना देण्यात आले होते. सदर योजनेमध्ये **कृत्रिम अवयव व उपकरणे पुरविण्याबाबत केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे उत्पन्न व आर्थिक सहाय्याच्या मर्यादेत बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.**

(२) त्यास अनुसरुन वरील शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अपंगांना कृत्रिम अवयव व साधणे पुरविणे याबाबतच्या योजनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मंजुरी देत आहेः-

(अ) सदरहू योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा तथा अवयव व साधने खरेदीसाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा खालीलप्रमाणे राहीलः-

| मासिम उत्पन्न | अवयव व साधने खरेदीसाठी आर्थिक मदतीची मर्यादा |
|---|---|
| (१) | (२) |
| रुपये १,५०० पर्यंत | १०० टक्के |
| रुपये १५,०० ते २,००० | ५० टक्के |

(ब) कृत्रिम अवयव व साधने प्रौढ व्यक्तीना ३ ते ५ वर्षातून एकदा व १५ वर्षाखालील मुलांना

Scanned with OKEN Scanner

दरवर्षी देण्यात येतील.

(क) कृत्रिम अवयवासाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा ही कमीत कमी रुपये २५ ते जास्तीत जास्त रुपये ३,००० पर्यंत राहील.

(ड) कृत्रिम अवयव बसविण्यासाठी आकारण्यात येणा-या खर्चाच्या (fitting charges) १५ टक्के ही रक्कम लाभार्थ्यांस देण्यात येईल.

(इ) कृत्रिम अपंगांसाठी रेल्वे व एस.टी.वाहतूक खर्च रुपये १५० पर्यंत देय राहील व अस्थिव्यंग व्यक्तींबाबत तज्ञाने साथीदारांविषयी शिफारस केली असल्यास ही सवलत साथीदारासही देय राहील.

(फ) ज्या अपंगांचे उत्पन्न दरमहा रुपये १,२०० पर्यन्त आहे अशा कृत्रिम अवयव बसविण्यासाठी दाखल होणा-या अपंग व्यक्तींना भोजन निवासासाठी प्रतिदिनी रुपये १० देय असतील. तथापि, अशा प्रत्येक अपंगास देण्यात येणारी एकूण रक्कम रुपये १०० पेक्षा जास्त असणार नाही. तसेच अपंग व्यक्तींच्या मदतनीसास भोजन व निवासासाठी अर्थसहाय्य दिले जाणार नाही.

(३) याबाबत होणारा खर्च रुपये ९०,००० (रुपये नव्वद हजार फक्त) हा २२३५-०२-समाज कल्याण-१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण (३) अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्यांचे शिक्षण व कल्याण (दोन) (ए) शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या व्यक्तींना कृत्रिम अवयव इत्यादी पुरविणे-सहाय्यक अनुदान (२२३५-०८२१) या अर्थशीर्षाखाली खर्ची घालून त्या खालील सन १९८९-९० या आर्थिक वर्षात केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

(४) हा शासन निर्णय, वित्त विभागाचे सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ पत्र क्रमांक ५६२/८९/व्यय-११, दिनांक १८ जून १९८९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्य पाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज.द.बेशरकर**
सहाय्यक सचिव

Scanned with OKEN Scanner